लेखकाचा जीवनाबद्दलचा दृष्टिकोण हाही महत्त्वाचा घटक असतो. अशा रीतीच्या कल्पनांचा किंवा विचारांचा अभ्यास हा खऱ्या संशोधकाच्या बुद्धीला आव्हान देऊ शकतो. या ठिकाणी हे गृहीत धरले आहे की, लेखकाची एक कृती ही दुसऱ्या कृतीपेक्षा वेगळी असली, तरीही त्या दोहोंत काही सर्वसाधारण सूत्र आढळते. उदाहरणार्थ, डी. एच. लॉरेन्स या लेखकाच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करताना पुरुष आणि स्त्री ह्यांच्यांतील नात्याचा शोध हे एक सर्वसाधारण सूत्र आढळून येते. जे. डी. सॅलींजर हा अमेरिकन कादंबरीकार झेन बुद्धिझम या तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेला आढळतो. आणखी एक उदाहरण म्हणजे जयवंत दळवी यांच्या अनेक कादंबऱ्यांतून वेड ही मानसिक अवस्था व कामप्रवृत्ती यांचा शोध घेतलेला आढळतो.

मात्र लेखकाच्या विचार व आचार कल्पनांची चर्चा करताना त्याच्या कलाकृतीतील वाङ्मयीन मूल्ये बाजूला पडण्याची शक्यता निर्माण होते. नीतिमत्ता आणि बुद्धिप्रामाण्याची मर्यादित चौकट ही सर्जनशील मनाची चांगली ओळख करून घेऊ शकेलच, असे नाही.

(४) तुलनात्मक अभ्यास

दोन लेखकांमधील समान गुणधर्म शोधून तौलनिक विचार मांडणे हाही लेखक-अभ्यासाचा एक प्रकार आहे. तुलनात्मक अभ्यासासाठी लेखक निवडताना ते कुठले निवडावे यासंबंधी काळजी घेतली पाहिजे. उदाहरणार्थ, अल्बेर कामू आणि सार्त्र यांचा तुलनात्मक अभ्यास हा उचित ठरेल. कारण दोघेही समकालीन, समदेशीय, अस्तित्ववादी विचारवंत आहेत. त्याचप्रमाणे सॉल बेलो आणि हेमिंग्वे यांची तुलना त्यांनी मांडलेल्या मृत्यूच्या कल्पनांबाबत होऊ शकेल. परंतु बऱ्याचदा असे दिसते की, तौलनिक विचार हा संशोधनासाठी सोयीचा असल्याने कमी श्रमात संशोधन-पदवी मिळविण्यासाठी तुलनात्मक अभ्यास स्वीकारला जातो. उदाहरणार्थ, सुब्रमण्यम् भारती आणि वॉल्ट व्हिटमन यांची तुलना किंवा कमला दास आणि एमिली डिकिन्सन यांची तुलना. अशा रीतीच्या संशोधनामध्ये एखादाच साधर्म्याचा दुवा शोधून त्यावर दूरान्वित (far stretched) संकल्पनांचा थर दिला जातो आणि त्यावर संशोधनाचा डोलारा उभा राहतो.

(५) संहिता-समीक्षात्मक अभ्यास (Textual Study)

मॅकलीश या अमेरिकन कवीच्या ‘ A poem should not mean, but be ’ या शब्दांचा आधार घेऊन वर उल्लेखिलेल्या दृष्टिकोणांपैकी कुठलाही दृष्टिकोण न स्वीकारता केवळ लिखित शब्द हाच प्रमाण मानून हा अभ्यास केला जातो. लेखकाला जे काही सांगावयाचे आहे, ते केवळ त्याच्याच शब्दांतून आपल्याला सापडेल,

Scanned with OKEN Scanner

त्यासाठी बाह्य साधनांची आवश्यकता नाही असे काही संशोधक मानतात. वाङ्मयाचा अभ्यास करताना केवळ वाङ्मय हेच प्रमाणभूत मानणारा हा दृष्टिकोण योग्य वाटत असला, तरी सर्व काळातील लेखकांना आणि सर्व वाङ्मयप्रकारांना तो लागू पडेल काय याबद्दल साशंकता वाटते. शेक्सपीअरचे 'हॅम्लेट' समजावून घेण्यासाठी ख्रिश्चन धर्म व संस्कृती यांची माहिती असणे काही वेळा आवश्यक वाटते. अरुण कोलटकर यांची 'जेजुरी' ही इंग्रजी कविता वाचताना भारतीय संस्कृतीची पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागते.

तरीही असे म्हणता येईल की, कविता या वाङ्मयप्रकाराला आणि विशेषतः समकालीन वाङ्मयाला हा दृष्टिकोण लागू करता येईल; अन्य ठिकाणी मात्र हा दृष्टिकोण संशोधनाच्या अपुरेपणाचेच कारण ठरेल.

(६) लेखकाच्या चरित्राचा अभ्यास

लेखकाचे वाङ्मय व त्याचे चरित्र यांतील संबंध शोधणारा अभ्यास हाही संशोधनपद्धतीतील रूढ प्रकार आहे. लेखकाबद्दलच्या आठवणी, त्याने लिहिलेली पत्रे, आत्मचरित्रात्मक लेखन इत्यादी स्वरूपाची सामग्री ही संशोधकाची साधनसामग्री असते. सर्व प्रकारचे वाङ्मय हे मुळात 'वैयक्तिक' अनुभवातून सुरू होते आणि त्यामुळे लेखकाच्या वाङ्मयाचा त्याच्या चरित्राशी घनिष्ठ संबंध असतो हे खरे आहे. दुसरे असे की, आपल्या आवडत्या लेखकाच्या चरित्राबद्दल अनेक वाचकांना कुतूहल असते. इतर क्षेत्रांतील थोर व्यक्तिमत्त्वांच्या चरित्रांत जसा आपल्याला रस असतो, तसाच तो वाङ्मयीन क्षेत्रातील थोर व्यक्तींच्या चरित्रातही असतो.

परंतु या ठिकाणी उद्‌भवणारा मुख्य प्रश्न म्हणजे हा अभ्यास वाङ्मयीन ठरेल काय? वर म्हटल्याप्रमाणे सामाजिक दृष्टिकोण, ऐतिहासिक दृष्टिकोण इ. वाङ्मयावर अधिक प्रकाश टाकण्यास केव्हाही उपयुक्त ठरतात. परंतु लेखकाच्या चरित्राचा अभ्यास करून त्याच्या वाङ्मयाची जाण वाढते काय? आणि जरी ती वाढत असली, तरी ती वाङ्मयीन पद्धत होईल काय? लेखकाच्या चरित्रातील कुठला मुद्दा याबाबत उपयोगी पडेल आणि कितपत हे कळणे अत्यंत कठीण आहे. आपल्याला दुर्लक्षणीय वाटलेली एखादी गोष्ट त्याच्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाची असेल आणि या उलट त्याच्या आयुष्यातील यातना, दुःखे आणि खडतर जगणे यांचा त्याच्या वाङ्मयाशी काहीही संबंध नसेल. लेखकाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व हे त्याच्या लौकिक व्यक्तिमत्त्वापेक्षा वेगळे असते, हे मानणारा कोणीही समीक्षक हे मान्य करील की, लेखकाचा चरित्रात्मक अभ्यास हा वाङ्मयीन दृष्टिकोणातून करणे म्हणजे केवळ अनुमानांवर आधारलेल्या तर्कांचा आधार घेऊन संशोधनाचा शास्त्रशुद्ध पाया भिडकारणे आहे.

डी. एच. लॉरेन्सच्या चरित्रात्मक अभ्यासातून त्याचे विकृत (Morbid) असे

व्यक्तिमत्त्व उभे करण्यास संशोधकाला जागा सापडली की, त्याला लेखकाच्या सर्जन लेखनात हाच घटक महत्त्वाचा वाटायला लागतो. एमिली डिकिन्सनचे एकाकी आयुष्य त्याने पाहिले की, तिच्या सर्वच काव्यात तो एकटेपणा हे सूत्र शोधू लागतो. शेक्सपीअरच्या आयुष्यात कोणी एक स्त्री आली (तिला संशोधक 'डार्क लेडी' असे म्हणतात), शेक्सपीअरचा प्रेमभंग झाला हे कळले की, संशोधक त्याचा संबंध शेक्सपीअरच्या शोकांतिकांशी लावून त्यांचे स्वरूप पार खुजे करून टाकतो. चरित्रात्मक संशोधनाची पद्धती म्हणजे लेखकाच्या वाङ्मय लिहिण्यामागच्या हेतू (Intention) आधी समजावून घेऊन त्या हेतूचे वाङ्मयावर कृत्रिम आरोपण करणे आहे. एका इंग्रजी टीका-निबंधाच्या भाषेत ही 'Intentional Fallacy' आहे. या निबंधात म्हटल्याप्रमाणे लेखकाचा हेतू हा उपलब्ध नसतो आणि तो शोधणे उपयुक्त किंवा योग्यही नसते.५

शेक्सपीअरची माणूस म्हणून ओळख करून घेणे हे कोणाही वाचकाला आवडेल. अभिनेता शेक्सपीअर, व्यवस्थापक शेक्सपीअर, मर्मेडच्या दारूच्या दुकानात बसलेला शेक्सपीअर, स्ट्रॅटफोर्डचा नागरिक शेक्सपीअर ही शेक्सपीअरची रूपे बघणे तो निश्चित पसंत करील. पण याच ठिकाणी हे स्पष्ट केले पाहिजे की, यात कुतूहलाशिवाय दुसऱ्या कशाचाही संबंध नसतो. चरित्रात्मक अभ्यासक हा केवळ अशा वाचकांचे कुतूहल शमवीत असतो. थोडक्यात म्हणजे चरित्रात्मक दृष्टिकोणाच्या उपयोगांपेक्षा वर उल्लेखिलेले धोकेच अधिक आहेत.

समारोप

लेखकाचा वाङ्मयीन अभ्यास करताना लेखकाची निवड ही महत्त्वाची असते. ती करताना आपल्या आवडीबरोबरच इतर गोष्टींचाही विचार अभ्यासकाने करावयास हवा. लेखक निवडल्यानंतर त्याच्या वाङ्मयाकडे बघण्याचा दृष्टिकोण लेखकाच्या वाङ्मयाची प्रकृती बघून निश्चित करावा आणि त्यानंतर कुठल्याही तऱ्हेचा सोपा मार्ग न स्वीकारता, कठोरपणे व परिश्रमपूर्वक संशोधनास शास्त्रशुद्ध पाया देणे, हेच खऱ्या संशोधकाचे कार्य मानणे आवश्यक आहे.

* *

५. "(We argued that) the design or intention of the author is neither available nor desirable as a standard for judging the success of a work of literary art. . ."—W. K. Wimsatt and M. C. Beardsley, 'The Intentional Fallacy.'

प्रास्ताविक

प्रत्यक्ष विषयाला प्रारंभ करण्यापूर्वी काही गोष्टींचे थोडे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. साहित्य-संशोधनाच्या अनेक पद्धती आहेत. त्यांपैकी 'तुलनात्मक संशोधन-पद्धती' ही एक आहे. या संशोधन-पद्धतीचा अवलंब अलीकडच्या काही वर्षांत अधिक प्रमाणात व्हावयास लागला आहे. हिंदीत या ('Comparative Research') साठी 'तुलनात्मक अन्वेषण' असा शब्द समर्पकपणे रूढ आहे.

तुलनात्मक संशोधनासाठी काही वेगळे निकष नाहीत. इतर प्रकारच्या संशोधनासाठी जे निकष लागतात, तेच या संशोधन-पद्धतीतही गृहीत असतात.

तुलना

विराट विश्वात नकळत अखंडपणे तुलना चालू असते. बरेवाईट, प्रिय–अप्रिय, पाप–पुण्य, खरे–खोटे, उच्च–नीच, पसंत–नापसंत, श्रेष्ठ–कनिष्ठ इत्यादी द्वंद्वांत याचे प्रत्यंतर मिळते. कोणतीही वस्तू, कला, नीती, रंग, व्यक्ती इत्यादींच्या संदर्भात सर्वत्र तुलना करूनच आपण

साहित्य–संशोधन : तुलनात्मक पद्धती

सुधाकर शंकर कलावडे

त्यांना स्वीकारत असतो. एखादे नाटक, गीत, चित्र, शिल्प, मूर्ती, चित्रपट, उद्यान, वृक्ष, फूल आपणास आवडते तेव्हा या प्रक्रियेत अप्रकट तुलना होऊन इतरांपेक्षा त्या आवडलेल्या गोष्टीने आपले मन वेधून घेतलेले असते. "आपल्या सर्व व्यवहारांत आपण प्रकट किंवा अप्रकट तुलना करून निर्णय घेत असतो." [1]

वास्तविक तुलना ही खऱ्या अर्थाने होऊ शकत नाही. भाषेमध्ये कोणत्याही शब्दाला नेमका प्रतिशब्द नसतो. निसर्ग कोणताही व्यर्थ भार सहन करण्यास तयार नसतो. प्रत्येक शब्दाचे स्वतःचे व्यवच्छेदक लक्षण असते व त्यावरच त्याचे अस्तित्व अवलंबून असते. विविध भावच्छटा व्यक्त करण्यास विविध शब्द असतात. उदाहरणार्थ सूर्य, पूषा, दिवाकर, प्रभाकर, दिनकर, भास्कर, आदित्य, सहस्ररश्मी, मित्र या सर्व शब्दांचा अर्थ केवळ 'सूर्य' नसून त्यांत विविध भावच्छटा आहेत. घट, डेरा, रांजण, सुगड इत्यादी समानार्थी शब्द नाहीत. याउलट एक शब्द भिन्नभिन्न अर्थाने वापरला जातो. उदाहरणार्थ—'श्याम' हा सावळा, निळा, जांभळा, काळा इत्यादी अर्थाने प्रयुक्त होतो. तुलना सजातीय, समानधर्मी भाव, कल्पना, विचार, वस्तू यांच्यांत होऊ शकते, आणि या सर्वांना व्यक्त करणारे शब्द तर एकार्थक नसतात. त्यामुळे तुलना करणे अशक्य होते. पण व्यावहारिक दृष्टीने तुलना होत असतेच. तीच आपण पाहणार आहोत.

तुलना, अन्य क्षेत्रांप्रमाणे ललितकला क्षेत्रात पण प्राणभूत तत्त्व आहे. कलाविषयक मूल्ये ही पण तुलनेतूनच निर्माण होत असतात. पुरातन परंपरांचा अवलंब न करतासुद्धा श्रेष्ठ कलाकृती अमर बनून नवीन मानदंड स्थापित करते. एखादी उत्कृष्ट कलाकृती श्रेष्ठ या पदावर आरूढ होत असताना तुलनात्मक दृष्टीने अन्य कलाकृतींपेक्षा उत्तमतेची मान्यता प्राप्त करीत, स्वतःच्या कलागुणांनी शिखर गाठत असते. विश्वात विखुरलेल्या लाखो लेखक-कवींतून व्यास, वाल्मीकि, कालिदास-शेक्सपीअर, गटे, मिल्टन, होमर इत्यादींना जेव्हा आपण श्रेष्ठ स्थान देतो तेव्हा तुलना आपोआपच झालेली असते. तुलनात्मक दृष्टिकोण नसेल तर 'महान', 'श्रेष्ठ', 'उत्कृष्ट' इत्यादी विशेषणेच राहू शकणार नाहीत. पण क्षणाक्षणाला विश्व परिवर्तित होत असते. एकीकडे स्थायित्व व दुसरीकडे परिवर्तनशीलता व त्यामुळे भिन्नता यांमुळे तुलनेचा अपरिहार्यतेने प्रवेश होतो.

तुलना ही प्रकट व अप्रकट असते. दैनंदिन व्यवहारात अप्रकट तुलनेचा वापर होत असतो. उदाहरणार्थ, आपण विशिष्ट आकाराचा व रंगाचा पेन घेतो. तो अप्रकट

---

१. वसंत बापट—तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्त्वे आणि दिशा, मौज प्रकाशन गृह. मुंबई, सप्टेंबर १९८१, पृ. १५

Scanned with OKEN Scanner

तुलनेनेच येत असतो. अर्थात यात अभिरुचिसंपन्नता, संस्कार यांचा भाग पण असतो.

साहित्यात आपणास प्रकट तुलना केलेली दिसते. समीक्षेत दोन कवी, दोन लेखक, दोन कृती, दोन भाषा, दोन साहित्यिक प्रवृत्ती यांत प्रकट तुलनेचा आश्रय घेतलेला असतो. मराठीत कालिदास व भवभूती यांत श्रेष्ठ कोण, अथवा शाकुंतल व उत्तर-रामचरित यांत उत्कृष्ट कृती कोणती हा वाद झाला, तसाच हिंदीत बिहारी व देव यांत कोण श्रेष्ठ हा वाद झाला.

तुलनात्मक संशोधन

तुलनात्मक पद्धती संशोधनाची आधारशिला आहे. सामान्य अभ्यासात साहित्य, इतिहास, शास्त्र, तत्त्वज्ञान, विज्ञान इत्यादी वेगवेगळे जाणवतात, पण संशोधन-क्षेत्रात ही सर्व अनंत ज्ञानाची विभिन्न क्षेत्रे आहेत आणि ती परस्परांना प्रकाशित करीत असतात. वैज्ञानिक, समाजशास्त्रीय किंवा साहित्यिक संशोधन-स्वरूपात कोणताही मूलभूत भेद नाही. संशोधनात नवीन तथ्य, नवीन विचार, निष्कर्ष, दृष्टी, परंपरा, कारण इत्यादींचे प्रकटीकरण आवश्यक असते. ज्ञानक्षेत्रातील कोणत्याही विद्याशाखेत विज्ञान, मानव, सामाजिक शास्त्र, कला—संशोधकास तुलनात्मक पद्धतीचा अपरिहार्य-पणाने प्रयोग करावाच लागतो. कारण संशोधनाची मूलतत्त्वे एकच असतात : सूक्ष्म सोद्देश्य निरीक्षण, परीक्षण, प्रयोग व नंतर गंभीर विवेचन. त्या गंभीर विवेचनात अनुकूल व प्रतिकूल घटना, उदाहरणे, विचार, मुद्दे असतात. वैज्ञानिक संशोधनाप्रमाणेच साहित्यिक संशोधनात नवार्जित ज्ञानाची व्याख्या पूर्वार्जित ज्ञानाच्या प्रकाशात करून सुसंगती निर्माण केली जाते. विषय कोणताही असला तरी विवेचनात निष्पक्ष वैज्ञानिक पद्धतीचा प्रयोग करून त्यास स्वरूप दिले जाते. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वैद्यक-शास्त्र, तर्कशास्त्र, गणितशास्त्र, सामाजिकशास्त्र अथवा साहित्यशास्त्र कोणत्याही विषयात तुलना ही अनुस्यूत असते. सारांश, विश्वकेंद्राच्या मध्यभागी मानव कल्पिल्या-नंतर, मानवी मनात उठणारे तुलना—तरंग, मानवाला केंद्रीभूत मानून बनलेल्या सर्व शास्त्रांत, ज्ञानशाखांत अपरिहार्यपणे येणार यात संशय नाही.

मानव-जीवनाला स्पर्श करणाऱ्या सर्व ज्ञानक्षेत्रांत तुलनापद्धतीचा अपरिहार्यतः प्रयोग होत असला तरी या सर्वांचा विचार येथे करण्याचा हेतू नाही. साहित्य-संशोधनात तुलनात्मक पद्धतीचा प्रयोग कसा होतो, त्याचे महत्त्व, उपयुक्तता, उद्दिष्ट यांविषयी विचार येथे अभिप्रेत आहे.

तुलनात्मक संशोधन—प्रारंभ व परंपरा

तुलनात्मक पद्धतीचा प्रयोग संशोधनात फार प्राचीन काळापासून केला जात असे.

Scanned with OKEN Scanner

त्या काळी प्रवासमार्ग चांगल्या अवस्थेत नसतानासुद्धा अनेक विद्वानांनी दूरदूरचा प्रवास करून विद्याप्रसार केला आहे. या विद्यानुरागी व्यक्तींनी मृत्यूला सामोरे जाऊन संस्कृत व पाली या माध्यमांतून भारतीय विचार व चिंतन-प्रणाली यांचा चीन, जपान, सिलोन, तिबेट इत्यादी देशांत प्रसार केला. त्यांच्यामुळे रामायण, महाभारत, आयुर्वेद, धनुर्वेद इत्यादी आशियातल्या अनेक देशांत पोहोचले. पण या काळात साधारणतः दोन राष्ट्रांतील भाषांमध्ये तुलना होण्याइतका संपर्क स्थापित झाला नव्हता. प्राचीन ग्रीक, चिनी, पर्शियन, संस्कृत या भाषांसंबंधी हे विधान तितकेच यथार्थ आहे. प्राचीन काळी बिलकूल तुलनात्मक पद्धतीचे संशोधन नव्हते हे म्हणणे योग्य ठरणार नाही. कोणत्याही कृतीचे समीक्षण करण्यापूर्वी समीक्षकाला परंपरा, विकासक्रम इत्यादींचा विचार केल्याशिवाय आणि त्या कृतीचे स्थान निश्चित केल्याशिवाय गत्यंतरच नसते. वेद-उपनिषदांची चिंतन आणि अनुभवपद्धती, दर्शन, व्याकरण, नीती, काव्यशास्त्राची खंडन–मंडन–मंथनप्रणाली या संशोधनाच्या गौरवपूर्ण परंपरा आहेत. तुलनात्मक संशोधनाच्या आधारेच अभिनवगुप्ताचे मोल समजते. संस्कृत ज्ञानशाखांचा विस्तार, वैभव तुलनात्मक पद्धतीवर अवलंबून होते. कोणत्याही सिद्धान्ताचा ऐतिहासिक विकास-क्रम प्रस्तुत करताना व त्या सिद्धान्ताचे महत्त्व विशद करताना तुलनात्मक पद्धतीचा आश्रय घेतलेला आढळेल.

पाश्चात्त्य साहित्यिक आलोचनेच्या इतिहासावरून असे दिसून येते की, सिकंदराच्या विजयामुळे ग्रीक राज्याचा प्रसार व ग्रीक संस्कृतीचा विस्तार झाला व त्यामुळे इसवी सनापूर्वी दोन शतके ग्रीक भाषा व साहित्य यांची चर्चा अथेन्सपासून दूरवर असलेल्या देशांतील विद्वानांमध्ये सुरू झाली. ग्रीक संस्कृतीच्या प्रसाराबरोबर अन्य देशांतील विद्वानांचे लक्ष ग्रीक भाषेकडे आकर्षित झाले व त्यांनी त्या भाषेचा अभ्यास करण्यास प्रारंभ केला. प्राचीन ग्रंथ व हस्तलिखिते यांचा शोध घेतला जाऊ लागला. त्यांचे संशोधन होऊ लागले. विशिष्ट रचना वस्तुतः विशिष्ट कवीची आहे किंवा नाही, ती रचना व तिचा शुद्ध पाठ यांविषयी विचार होऊ लागला. या संबंधात शब्द, वाक्य-खंड, वर्णनशैली इत्यादींचा पूर्ण विचार होत असे. या 'मूलपाठ निर्धारण' पद्धतीने प्राचीन ग्रंथांच्या संपादनकार्यात बहुमोल साहाय्य केले आहे. यामुळे ऐतिहासिक व तुलनात्मक आलोचनाशैलीचा जन्म झाला. रोमवासी समीक्षकांनी नंतर या प्रणालींना आत्मसात केले.

"मध्ययुगीन युरोपामधील प्रबोधन युगामध्ये (Enlightenment) ग्रीक व रोमन साहित्य आणि युरोपीय प्राकृत (Native) भाषांतील साहित्य यांच्या संदर्भात तुलना-त्मक विचाराला प्रारंभ झाला."[२] या विचाराचा अध्वर्यू इटालियन महाकवी दांते

....

२. "तौलनिक साहित्याभ्यास", पृ. २–३

मानला जातो. युरोपमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक अभिसरण एकोणिसाव्या शतकात होऊ लागले. नव्या औद्योगिक प्रभावामुळे युरोपमधील राष्ट्रांमध्ये शिक्षा, वाङ्मय व तत्त्वज्ञान या क्षेत्रांत परस्पर परिणाम होऊ लागला. गेल्या दोन हजार वर्षांमध्ये झाले नाही इतके सांस्कृतिक आदान-प्रदान या गेल्या दोन शतकांत झाले. युरोपीय राष्ट्रांनी साम्राज्य स्थापण्यासाठी अनेक देशांवर आक्रमणे केली. त्यांच्या या साम्राज्य-स्थापनेच्या महत्त्वाकांक्षेमुळे युरोपीय संस्कृती अनेक देशांत पोहोचली. राष्ट्रीय संस्कृती-बरोबरच युरोपीय संस्कृतीच्या कल्पनेला जन्म मिळाला. राष्ट्राराष्ट्रांतील एककेंद्रीय संस्कृतीच्या भिंती कोसळून पडू लागल्या. जित व जेते यांच्या व्यापाराप्रमाणेच संस्कृतीचे पण आदान-प्रदान सुरू झाले. भाषा, साहित्य, तत्त्वज्ञान यांची देवाण–घेवाण सुरू झाली. जित राष्ट्रातील अमोल सांस्कृतिक ठेवा पाहून युरोपीय पंडित चकित झाले व त्यांनी चिनी, अरबी, इराणी व भारतीय संस्कृतींचा अभ्यास युरोपमध्ये सुरू केला. युरोपातील मॅक्समुल्लरसारख्या अनेक विद्वानांनी संस्कृत साहित्याच्या अध्ययनास आपले जीवन समर्पित केले. अठराव्या शतकात डु पेरॉ हा विद्वान भारतीय व इराणी धर्मग्रंथांचा शोध घेण्यासाठी मुंबईकडे निघाला. त्याला उपनिषदांचा पर्शियन अनुवाद मिळाला. त्याने तो लॅटिनमध्ये अनुवादित केला. तो लॅटिन अनुवाद वाचून प्रख्यात तत्त्वज्ञ शोपेनहोअर अत्यंत प्रभावित झाला होता. भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव भारतीय साहित्यापेक्षा पुष्कळच अधिक पडला. कांट, शोपेनहोअर, हेगल, नीत्शे, शेलिंग या महान तत्त्वज्ञांवर, तसेच कार्लाईल, इमर्सन यांच्या लेखनावर पण त्यांचा प्रभाव पडला. वोल्तेअर, किपलिंग यांच्यावर प्रतिकूल परिणाम झाला. किप्लिंगची 'West is West and East is East' ही प्रसिद्ध उक्ती त्याची साक्ष आहे. मलार्मे, व्हिटमन, मेटरलिंक, टॉलस्टॉय, हरमान हेस, ई. एम्. फॉस्टर, एडवर्ड थॉम्पिसन, डब्लू. बी. येटस, आंद्रजीद, टी. एस. इलियट, आल्डस हक्सली, इशरवुड इत्यादींवर भारतीय साहित्य व तत्त्वज्ञान यांचा प्रभाव या ना त्या रूपात दिसून येतो. याउलट भारतीय भाषा, साहित्य, संस्कृती यांना पाश्चात्त्य संस्कृतीने खूपच मोठ्या प्रमाणात प्रभावित केले.

१७८४ साली कलकत्ता येथे एशियाटिक सोसायटीची स्थापना झाली. या संस्थेमुळेच वेद, महाकाव्ये, ललित वाङ्मय, हिंदू व बौद्ध धर्मग्रंथ यांचा परिचय युरोपला झाला. याउलट इंग्रजी विद्येमुळे भारताचा पण अपार लाभ झाला. साहित्य-संशोधन-क्षेत्रात इंग्रजीमुळे मोठे परिवर्तन झाले.

अठराव्या शतकाच्या शेवटी सर विल्यम जोन्सने भारतीय भाषांविषयक विद्याशाखा (Indology) स्थापन करून भारतीय साहित्य व युरोपीय साहित्य यांच्या तुलनात्मक अभ्यासाचा पाया घातला. सर विल्यम जोन्सने अपार श्रम घेऊन, आर्थिक झीज सोसून संस्कृत भाषेचे शिक्षण घेतले. तुलनात्मक संशोधनात सर विल्यम जोन्स हा

Scanned with OKEN Scanner

एक दीपस्तंभ आहे. त्याने संस्कृत व युरोपीयन भाषा यांत साम्य दाखवून त्यांचा वंश एकच असल्याचे सिद्ध केले. तौलनिक भाषाविज्ञानाचा पाया या भाषेच्या तुलनात्मक संशोधनाने घातला गेला.

१७८९ मध्ये विल्यम जोन्सने ' शांकुतल 'चा अनुवाद केला. एकोणिसाव्या शतकात भारतीय भाषा व साहित्य यांचा अभ्यास करणारे अनेक इंग्रजी अधिकारी आपणास दिसून येतात. जर्मन विद्वानांनी आशियातील सांस्कृतिक वैभव व श्रेष्ठता दाखवून दिले. शिलर व श्लेगल यांना या दृष्टीने मोठे श्रेय आहे. पण महाकवी गटे याचे कार्य या दृष्टीने अमोल व अविस्मरणीय आहे

भारतात एकोणिसाव्या शतकापूर्वी साहित्यात भारतीय परंपरा दृढ होती, आणि या साहित्य-परंपरेचे अध्ययन करताना संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या भाषांच्या अभ्यासाची आवश्यकता असे. मध्ययुगीन भारतीय साहित्यावरील प्रभाव पाहण्यासाठी या भाषांचे मूलभूत (बेसिक) ज्ञान आवश्यक मानले जाई. या भाषांच्या ज्ञानाशिवाय मध्ययुगीन साहित्यावरील संशोधनात अपूर्णता येणे शक्य आहे. या संदर्भात हे लक्षात घ्यावे की, " पाश्चात्त्य राष्ट्रात काही विद्यापीठांत काही विषयांसंबंधी संशोधनासाठी फ्रेंच किंवा जर्मन भाषेचे ज्ञान आवश्यक मानले जाते. संशोधन करणाऱ्याला यांपैकी एका विषयाचे ज्ञान प्राप्त केल्याशिवाय पदवी प्रदान केली जात नाही. "[३]

मेकॉलेच्या दर्पोक्तीमुळे तुलनात्मक संशोधनाला चालना मिळाली. लॉर्ड मेकॉले याने फेब्रुवारी १८३५ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिकला पत्र लिहिले. त्यात त्याने म्हटले की, एखाद्या चांगल्या युरोपियन ग्रंथालयातील एखाद्या आलमारीत जेवढे ज्ञानभांडार असेल तेवढे पौर्वात्यांच्या संपूर्ण साहित्यात नाही आणि पुढे तो म्हणतो, " संस्कृत भाषेत लिहिलेल्या सर्व पुस्तकांतील ऐतिहासिक माहिती एकत्र केली तर ती इंग्लंडमधील प्राथमिक शाळेत शिकवल्या जाणाऱ्या इतिहासाच्या चोपडीपेक्षा कमी महत्त्वाची आहे. "[४] मेकॉलेच्या या दर्पोक्तीच्या खंडणासाठी भारतीय व युरोपीय पंडितांनी उभय साहित्याचा गाढा अभ्यास केला व आपल्या तुलनात्मक संशोधनाच्या आधारे त्याचे खंडन केले.

---

३. संपादक, डॉ. सावित्री सिन्हा, अनुसंधान का स्वरूप, पृ. १९.

४. " It is, I believe, no exaggeration to say that all the historical information which has been collected from all the books written in the Sanskrit language is less valuable than what may be found in the most paltry abridgement used at preparatory scoools in England. "– (उद्धृत, " तौलनिक साहित्याभ्यास ", पृ. १०)

तुलनात्मक संशोधनाची क्षेत्रे

साहित्य व्यापक व देशकालातीत असते. साहित्याच्या संशोधनाला सार्वकालिक किंवा सार्वदेशिक विचारांचा समावेश केल्याशिवाय परिपूर्णता येऊ शकणार नाही. उदाहरणार्थ, हिंदी भक्तिकाव्याचा विचार व विश्लेषण करताना भारतातील अन्य प्रांतीय भाषांत ही जी प्रवृत्ती आहे तिचा विचार व विश्लेषण करावे लागेल. त्याशिवाय त्यात परिपूर्णता येणार नाही, आणि जर अभ्यासकाजवळ पुरेसा वेळ, क्षमता, शक्ती व योग्यता असेल तर त्याने त्याला ज्ञात विश्वातील विभिन्न भाषांमधील भक्तिसाहित्याशी हिंदी भक्तिसाहित्याची तुलना करावयास हवी. संशोधन-विषयासंबंधी सांगोपांग ज्ञान प्राप्त करण्यासाठी चार तत्त्वांचा आश्रय घेतला जातो. (१) समता (Similarity), (२) अभेद (Identity), (३) पार्थक्य (Contrast), (४) विषमता (Contradiction)

तुलना जीवनातील एक बौद्धिक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतूनच विश्लेषणात्मक पद्धती जन्मास येते. तुलनेने दोन श्रेणी मिळतात. समातना व विषमता, अभेद व पार्थक्य. पूर्वग्रहदूषित होऊन ओढाताण करून अभ्यासकाने समता अथवा अभेद दाखवण्याचा प्रयत्न करू नये. आलोच्य विषयाचे निःपक्षपाती भावाने आलोडन करून नंतर दोन साहित्यांतील वैशिष्ट्यांच्या आधारे समानता प्रदर्शित करण्याचा विवेक दाखवावयास हवा.

तुलनात्मक साहित्य–संशोधन या शब्दावलीचे तात्पर्य आहे : दोन. भाषा, दोन लेखक, दोन साहित्यप्रकार, दोन कालखंड, दोन परिवेश इत्यादींना अध्ययन-सामग्री बनवून परस्परप्रभावाचे अथवा एकाच्या दुसऱ्यावर झालेल्या प्रभावाचे मूल्यांकन करणे.

डॉ. मनमोहन सहगल यांनी तुलनात्मक संशोधनाची दहा क्षेत्रे मानली आहेत.[५] त्या तुलनात्मक संशोधनक्षेत्रांचे विवरण खाली दिले आहे. त्यासाठी दिलेली उदाहरणे ही काल्पनिक नसून पीएच. डी. च्या स्वीकृत प्रबंधांची ती उदाहरणे आहेत.

१. एकाच भाषेतील दोन साहित्यप्रकार किंवा प्रवृत्तींचे अध्ययन

संशोधन करणारा जेव्हा दोन भाषांमध्ये संशोधन करण्याऐवजी एकाच भाषेतील दोन साहित्यप्रकारांचे अथवा दोन प्रवृत्तींचे तुलनात्मक अध्ययन करून संशोधन करू इच्छितो तेव्हा हे क्षेत्र निश्चित करतो.

(१) कृष्णभक्ती और रामभक्ती धारा. (२) प्रेममार्गी और ज्ञानमार्गी शाखा–दार्शनिक पृष्ठभूमी तुलना.

....

५. डॉ. मनमोहन सहगल—हिंदी शोधतंत्र की रूपरेखा, पृ. ३७.

Scanned with OKEN Scanner

२. एकाच भाषा-साहित्यातील दोन कालखंडांची तुलना

दोन वेगवेगळ्या काळांतील एक पद्धती किंवा त्या कालखंडांत लिहिलेल्या साहित्याची तुलना यांचे अध्ययन यात येते.

(१) हिंदी गद्य विकासक्रममें भारतेंदु और द्विवेदीयुग-तुलनात्मक अध्ययन.
(२) आदिकालीन और रीतिकालीन हिंदी वीर काव्य का तुलनात्मक अनुशीलन.
(३) हिंदी रीतिकाव्यपर हिंदी भक्तिकाव्य का प्रभाव.

३. एकाच भाषा–साहित्यातील दोन लेखक किंवा दोन कृती

यामध्ये एकाच भाषा-साहित्यातील योग्य अशा दोन लेखकांची अथवा दोन कृतींची तुलना अभिप्रेत असते. कधी कधी दोनापेक्षा अधिक लेखक अथवा कृती यांची पण तुलना यात येऊ शकते.

(१) कबीर, नानक और दादू का तुलनात्मक अध्ययन.
(२) मीरा और महादेवी : एक तुलनात्मक अध्ययन (हिंदी गीतिकाव्य परंपरामें)
(३) प्रसाद और पंतः छायावादके संदर्भ में तुलनात्मक अध्ययन.
(४) रामचरितमानस और साकेत.
(५) रामचरितमानस और रामचंद्रिका.
(६) श्रीधरी टीका आणि एकनाथी भागवत यांचा तौलनिक अभ्यास.
(७) चार प्रमुख मराठी गीताभाष्ये–भावार्थदीपिका, यथार्थदीपिका, गीतारहस्य, गीताप्रवचने : तौलनिक अभ्यास.

४. दोन भाषा–एक साहित्य प्रकार

हे क्षेत्र अत्यंत व्यापक आहे. यात अभ्यासक मातृभाषा व मातृभाषेतर भाषा या दोन्हींतील एक साहित्यप्रकार निवडून त्यावर संशोधनकार्य करतो. काव्य, कविता, कादंबरी, नाटक, एकांकिका, लघुकथा, लघुनिबंध इत्यादी साहित्यप्रकारांवर यात तुलनात्मक संशोधन होते.

(१) अग्रेंजी निबंधोंका हिंदी निबंधोंपर प्रभाव.
(२) हिंदी और बँगला नाटकों तथा रंगमंच का तुलनात्मक अध्ययन.
(३) हिंदी और तेलगु नाटक.
(४) हिंदी और फारसी सूफी काव्य.
(५) पंजाबी और हिंदी के वार्तासाहित्य से अभिप्राय.
(६) हिंदी नाटकों और उपन्यासों पर पाश्चात्य [आंग्ल, रूसी तथा फ्रांसीसी] प्रभाव.

Scanned with OKEN Scanner

५. दोन भाषांतील दोन लेखक

मातृभाषा व मातृभाषेतर एक भाषा यांवर प्रभुत्व असलेला अभ्यासक स्वतःच्या भाषेतील एका लेखकाची तुलना अन्य भाषेतील एका लेखकाशी करतो. आशय, अभिव्यक्ती, आकृतिबंध, कलासौंदर्य इत्यादींच्या आधाराने दोन भाषांतील दोन लेखकांची तुलना साधारणतः केली जाते.

(१) भारतेंदु हरिश्चंद्र एवं विष्णुशास्त्री चिपळूणकर.
(२) कबीर और तुकाराम.
(३) सूरदास और नरसी मेहता.
(४) भारतेंदु और केशवसुत के काव्य का तुलनात्मक अध्ययन.
(६) एकनाथ और तुलसीदास : तुलनात्मक अध्ययन.

६. दोन भाषा-साहित्यांतील एक विशिष्ट कालखंड

यात एका भाषेतील दोन कालखंडांऐवजी दोन भाषांतील एका कालखंडाचे अध्ययन करणे अपेक्षित असते आणि त्या आधारे अभ्यासक आपले निष्कर्ष सादर करतो.

(१) रीतिकालीन हिंदी तथा उर्दू काव्य (१८ वी शताब्दी).
(२) २० वी शताब्दी के मराठी और हिंदी नाट्यसाहित्य का तुलनात्मक अध्ययन
(३) स्वतंत्रतापूर्व हिंदी–गुजराती के उपन्यासों का तुलनात्मक अध्ययन.
(४) २० वी शताब्दी के हिंदी–मल्यालम् काव्य का तुलनात्मक अध्ययन.
(५) पंजाबी और हिंदी काव्य में भक्तिकाल.

७. दोन भाषांतील एकाच साहित्य–प्रकारावर लिहिणारे दोन लेखक

हे क्षेत्र संशोधनास अत्यंत व्यापक असे आहे. कविता, नाटक, कथा इत्यादी साहित्यप्रकारांचे प्रवृत्तिजन्य समानता असणारे लेखक अभ्यासासाठी निवडले जाऊ शकतात.

(१) उपन्यासकार प्रेमचंद और गॉर्की.
(२) सूरदास और नरसी मेहता का भक्तिकाव्य.
(३) प्रेमचंद और हरि नारायण आपटे : उपन्यासोंका तुलनात्मक अध्ययन.

८. दोन भाषा–साहित्यांतील एका प्रवृत्तीवर अथवा प्रणालीवर अभ्यास

शोधार्थी दोन्ही भाषांतील एखाद्या प्रवृत्तीवर अथवा प्रणालीवर संशोधन करू शकतो.

Scanned with OKEN Scanner

(१) आधुनिक हिंदी और मराठी कविता में राष्ट्रीय भावना.
(२) हिंदी और मराठी का रामकाव्य.
(३) हिंदी–गुजराती का रासकाव्य.
(४) हिंदी और उडिया का वैष्णव साहित्य.

९. दोन भाषांतील काव्यशास्त्र : तुलना

काव्यशास्त्र हा अत्यंत कठीण विषय मानला जातो. दोन कवी, कृती, प्रणाली यांच्यापेक्षा यात अधिक परिश्रम घ्यावे लागतात. यात हिंदी–मराठी, हिंदी-गुजराती, हिंदी-कन्नड, हिंदी-बंगाली इत्यादी काव्यशास्त्रांची तुलना संस्कृत-हिंदी काव्याव्यतिरिक्त होऊ शकेल.

(१) हिंदी तथा मराठी के काव्यशास्त्र का तुलनात्मक अध्ययन.
(२) संस्कृत और हिंदी काव्यशास्त्र में ध्वनिसिद्धान्त का एक तुलनात्मक अध्ययन.
(३) भारतीय और पाश्चात्य साहित्यशास्त्र में काव्यास्वाद का विवेचन.
(४) रीतिकाल के हिंदी लक्षण ग्रंथों तथा १७ वी १८ वीं शती के आंग्ल नव्यशास्त्र समीक्षाग्रंथों का तुलनात्मक अध्ययन.
(५) हिंदी तथा मल्यालम् के आधुनिक समीक्षाशास्त्र का तुलनात्मक अध्ययन. (१९०० ते १९६०)

१०. दोन भाषांतील व्याकरण किंवा भाषाशास्त्र यांतील एका भागावर तुलनात्मक अध्ययन.

व्याकरण किंवा भाषाशास्त्र यांत रस असणाऱ्यांना हे क्षेत्र चांगलेच उपलब्ध आहे. व्याकरणिक लिंग, वचन, क्रियापद, संयुक्त क्रियापद, सहायकारी क्रियापद, उपसर्ग, प्रत्यय, विशेषण, संज्ञा यांचा तुलनात्मक अभ्यास होऊ शकतो. भाषा विज्ञानाच्या दृष्टीने अर्थ-विचार, ध्वनी यांवर तुलनात्मक संशोधन होऊ शकते.

(१) A comparative study of the Verb Phrase-English-Marathi.
(२) English–Sindhi sound.
(३) महाराष्ट्रीय संतोंकी हिंदी कविता एवं उत्तरभारतीय कवितासे उसका तुलनात्मक भाषाशास्त्रीय तथा साहित्यिक विवेचन
(४) हिंदी तथा पंजाबी की ध्वनीयोंका ऐतिहासिक तथा तुलनात्मक अध्ययन.
(५) आधुनिक हिंदी और तमिल की व्याकरणिक रचना.
(६) अर्थविज्ञान की दृष्टीसे हिंदी एवं बांगला शब्दोंका तुलनात्मक अध्ययन.
(७) हिंदी कोश साहित्य (१५००–१८००) का आलोचनात्मक और तुलनात्मक अध्ययन.

Scanned with OKEN Scanner

११. अनुवादित साहित्य व मातृभाषा

याशिवाय अजून काही क्षेत्रांत तुलनात्मक संशोधनास वाव आहे. आज कोणत्याही एका भाषेतील साहित्य आपल्या परिघात बंद राहू शकत नाही. संपर्क साधनांच्या विकासाबरोबर विश्वातील भाषा एकमेकांना प्रभावित करीत आहेत. परिणामतः अन्य भाषेतील उत्कृष्ट, उन्नत व समृद्ध साहित्याचा स्वभाषेत अनुवाद करण्याचे प्रयत्न होतात. अनुवादास उत्तेजन देणाऱ्या काही संस्था पण काम करीत असतात. हिंदी-मध्ये इंग्रजी, पंजाबी, बंगाली, मराठी, गुजराती, उर्दू, तमिल, तेलगू, मल्याळम्, कानडी या भाषांतील अनेक उत्तम साहित्यकृतींचा अनुवाद झाला आहे व होत आहे. या अनुवादित साहित्याची हिंदीबरोबर अथवा मातृभाषेबरोबर तुलना होऊ शकते. ज्या भाषेतून मातृभाषेत ते साहित्य आयात झाले आहे, त्या भाषेच्या मूळ लेखकाची मानसिकता, विचारधारा, विचारपद्धती यांचे अध्ययन यात होऊ शकेल. काही शोध-कार्य या दिशेने झाले आहे.

(१) बंगाली के हिंदी अनुवादों का सर्वेक्षण और मूल्यांकन.
(२) आधुनिक भारतीय भाषाओं का हिंदी अनुवाद साहित्य.
(३) संस्कृत आणि पाश्चात्य नाटकांचे मराठी अनुवाद.
(४) हिंदीमें अनुवादित मराठी साहित्य ग्रंथ.
(५) वाल्मीकि रामायणाचे मराठीतील काव्यानुवाद.

१२. अंतर्शास्तीय (Interdisciplinary) तुलनात्मक अध्ययन

या क्षेत्रात शोधार्थी साहित्याच्या कोणत्या एका अंगाची ललितेतर साहित्याशी तुलना करतो अथवा त्यांचा एकमेकांवर प्रभाव प्रदर्शित करण्याचा प्रयत्न करतो. साहित्याचा मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, संगीत, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, सामाजिक शास्त्र यांच्याशी संबंध तर स्पष्ट दिसून येतो. साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडलेले असते. या दिशेने पण संशोधन झाले आहे.

(१) हिंदी साहित्य और भाषा विकास में रजतपट, रंगमंच और आकाशवाणी का योगदान.
(२) रीतिकालीन हिंदी और उर्दू काव्य का समाजशास्त्रीय विवेचन.
(३) मध्ययुगीन हिंदी साहित्य में शृंगारप्रसाधन और तत्कालीन मूर्तिकला तथा चित्रकला में प्राप्त सामग्रीसे तुलना.
(४) हिंदी के रीतिकालीन काव्य में वनस्पती जगत्.
(५) वैष्णव भक्तिकाव्य और भारतीय संगीत का परस्परसंबंध [आदिकालसे रीतिकाल के अंततक)

(६) संस्कृतमूलक हिंदी गणितीय शब्दावली का ऐतिहासिक, सांस्कृतिक तथा भाषाशास्त्रीय अध्ययन.

१३. प्रभाववादी साहित्य

एका भाषेचा दुसऱ्या भाषेवर प्रकारगत, आशयगत, तंत्रगत प्रभाव अथवा एका भाषेतील एका लेखकाचा अन्य भाषांमधील लेखकांवर परिणाम, अथवा एका विशिष्ट कालखंडाचा साहित्यातील प्रवृत्तींवर झालेला परिणाम इत्यादींचे तुलनात्मक संशोधन प्रभाववादी साहित्यांतर्गत येऊ शकेल. इंग्रजी साहित्याचा मराठी अथवा हिंदी साहित्यावर झालेला परिणाम, इंग्रजी नाटकांचा हिंदी–मराठी नाटकांवर झालेला परिणाम, विद्यापतीचा सूरदासावर प्रभाव अथवा केशवसुतांचा आधुनिक मराठी काव्यावर प्रभाव अथवा टी. एस. इलियटचा अज्ञेय, बा. सी.मर्ढेकर यांच्यावर प्रभाव यांवर प्रभाववादाचे तुलनात्मक संशोधन होऊ शकेल.

(१) हिंदी भाषापर फारसी–इंग्रजी का प्रभाव.
(२) शेक्सपीयरचा मराठी नाटकांवर परिणाम.
(३) आधुनिक हिंदी काव्यपर रवींद्र का प्रभाव.

तुलनात्मक संशोधन–अवरोध

तुलनात्मक संशोधनाचे क्षेत्र अत्यंत व्यापक आहे. जगातील कोणत्याही दोन भाषा, दोन कालखंड, प्रवृत्ती, साहित्यप्रकार, भाषाशास्त्र, व्याकरण, अनुवाद इत्यादी घेऊन त्यांवर तुलनात्मक संशोधन होऊ शकते. या दृष्टीने हा विषय विश्वव्यापी बनतो. विश्वव्यापकतेमुळे हा विषय सुलभ असेल हे मानणे योग्य होणार नाही. या उलट हा विषय अत्यंत जटिल, व्यामिश्र व कठीण आहे. एका भाषेतील संशोधन करण्यास जितके परिश्रम, कष्ट घ्यावे लागतात व वेळ लागतो त्याच्या दुप्पट परिश्रम, कष्ट व काळ तुलनात्मक संशोधनात, विशेषतः दोन भाषांतील संशोधनात लागतात. या दोन संशोधनांचे एकत्रीकरण होत असते. प्रबंधलेखनाचा विशिष्ट स्तर प्राप्त करण्यासाठी शोधार्थीला मातृभाषेवर पण प्रभुत्व प्राप्त करावे लागते. तुलनात्मक संशोधन करणाऱ्या अभ्यासकास मातृभाषेइतकेच अन्य भाषेवर प्रभुत्व प्राप्त करावे लागते. अन्य भाषेचे ज्ञान अथवा ती नुसती कळणे यामुळे तुलनात्मक संशोधनास उद्युक्त होणारा शोधार्थी अंतिमतः अयशस्वी झाल्याशिवाय राहात नाही. भाषेवर प्रभुत्व प्राप्त करणे श्रमसाध्य तर आहेच, पण त्यात अनेक वर्षे खर्ची पडतात. तुलनात्मक संशोधनाचे निष्कर्ष नेमक्या शब्दांत मांडणे ही गोष्ट अत्यंत दुष्कर आहे. मातृभाषेतर भाषेचे सांस्कृतिक, भौगोलिक, सामाजिक, ऐतिहासिक, राजनैतिक, धार्मिक, आर्थिक वातावरण भिन्न असते अथवा असण्याची शक्यता असते. शब्दांचे मृदुत्व, लालित्य, सौंदर्य, नादगुण,

Scanned with OKEN Scanner

भाषाशैली, सूक्ष्म भावच्छटा हे सर्व पाहावे लागतात. साहित्यात शब्दांचे अर्थ निश्चित नसतात, ते संदर्भानुसार बदलत असतात. कवी शब्दांवर नवीन अर्थाचा साज चढवीत असतो. शोधार्थीचे दोन भाषांवर समान प्रभुत्व नसेल तर निष्कर्षावर परिणाम होतो. सामान्य संशोधनात साहित्यातील आशय व अभिव्यक्ती नीट ग्रहण अथवा आकलन करता आली नाहीत तर त्या संशोधनाचा स्तर कधीही प्रशंसनीय राहात नाही. अकाट्य निष्कर्षासाठी दोन्ही भाषांवर समान प्रभुत्व असणे आवश्यक आहे आणि हे अनेकांना जमत नाही. त्यामुळे ते या क्षेत्राकडे प्रवृत्त होत नाहीत.

काही वेळेस शोधार्थी विद्वान व भाषाविज्ञ असतो. पण स्वदेश, स्वभाषा, स्वसंस्कृतीच्याविषयी त्याला अत्यधिक प्रेम, जिव्हाळा व आस्था वाटत असते. संशोधनात तटस्थता, अनाग्रह, निष्पक्षपातीपणा, वस्तुनिष्ठता, न्यायबुद्धी, सहृदयता इत्यादी गोष्टी आवश्यक असतात. अन्य भाषेविषयी अपसमाज, पूर्वग्रहदूषितता यांमुळे योग्य निष्कर्ष शोधार्थी देऊ शकत नाही. शोधार्थी हा या अवगुणांमुळे अन्य भाषेवर, त्या भाषेतील महान् लेखक-कवींवर अन्याय करीत असतो. परिणामतः त्याचे संशोधन " संशोधन कसे नसावे " याचा वस्तुपाठ बनते व अशा शोधार्थींमुळे संशोधनक्षेत्राची पण अपरिमित हानी होते.

तुलनेचे क्षेत्र जेवढे मर्यादित असते तेवढे तुलनात्मक संशोधन समर्पक व सुसंबद्ध ठरते. " हिंदी में हास्यरस और उसकी देशविदेशोंके साहित्य से तुलना " हा विषय, समजा, एखाद्या शोधार्थीने घेतला, व त्यास केवळ हिंदी, मराठी व इंग्रजी या भाषाच अवगत आहेत. विषयाची व्याप्ती तर जगातील सर्व भाषांशी संबंधित आहे. अशा स्थितीत क्षमता, योग्यता याप्रमाणे विषयाची सीमा निश्चित करून निवड करणे महत्त्वाचे आहे. शिवाय पिष्टपेषण विषयनिवडीत नसावे. वरील विषय " हिंदी–मराठी के आधुनिक नाटकों में अथवा काव्य में हास्यरस " असा होईल.

काही वेळेस शोधार्थी वरवरचे साम्य पाहून संशोधनकार्यास प्रवृत्त होतो, आणि मूलतः साम्य नसल्यामुळे ओढाताण करून तो ते साम्य दाखवण्याचा प्रयत्न करतो. श्रीमदान्ध्र भागवताचे रचयिता पोतना यांच्याशी तुलसीदासाची तुलना केवळ राम-भक्तीच्या आधारावर करणे योग्य होणार नाही. किंवा आंध्र प्रदेशातील तेलगूचे महाकवी श्रीनाथ यांची तुलना बिहारी अथवा केशवदास यांच्याशी श्रृंगार अथवा दरबारी कृती असणे या साम्यावर करणे अन्यायकारक आहे.

कधीकधी तुलनात्मक अध्ययनाशी संबंधित शीर्षक असते, पण तुलनात्मक सूत्र मात्र मिळत नाही. आधारभूत सामग्रीचे संकलन करून संशोधनात पूर्णता येत नसते. त्याचे विवरण, विश्लेषण, मांडणी आवश्यक आहे. त्यातून सुनिश्चित निर्णय व निष्कर्ष काढावे लागतात. त्यावाचून ते संशोधनास पात्र ठरणार नाही. विटांचा ढीग कितीही मोठा असला तरी त्याला आपण भिंत म्हणत नाही. जेव्हा विटा घेऊन त्या

Scanned with OKEN Scanner

विशिष्ट क्रमाने रचल्या जातात तेव्हा भिंत बनते. ज्ञानाच्या इतस्ततः पसरलेल्या विटांच्यातून शोधार्थी विषयानुकूल तेवढ्या घेऊन त्या विशिष्ट क्रमाने सादर करतो तेव्हा ते संशोधनकार्य बनते. औचित्य, उपयोगिता, तर्क यांच्या कसोटीवर कसल्या-नंतरच तुलनात्मक संशोधन-शीर्षक निवडणे योग्य होईल. अन्यथा हास्यास्पद तुलना-त्मक संशोधन करण्याऐवजी एका भाषासाहित्यातील एकांगी, सखोल संशोधन करणे श्रेयस्कर आहे.

तुलनात्मक संशोधन श्रमसाध्य, अधिक कालावधी लागणारे आहे. अशा स्थितीत शोधार्थीस आर्थिक दृष्टीने चिंतामुक्त राहणे आवश्यक आहे. प्रवास, पुस्तक, निवास, (अन्य प्रदेशात) जीवननिर्वाह यासाठी धनाची आवश्यकता आहेच. शोधार्थी धनिक असेल तर प्रश्न उपस्थित होणार नाही. विद्यापीठ अनुदान मंडळ, संस्था, अथवा मित्र, नातेवाईक यांच्याकडून विशिष्ट काळापर्यंत त्याला अर्थसाहाय्य मिळेल. पण तेवढ्या अवधीत संशोधनकार्य पूर्ण होईलच असे नाही. तुलनात्मक संशोधनास आठ ते दहा वर्षे सहज लागतात. एवढ्या दीर्घ अवधीपर्यंत अर्थाभाव सहन करणे शक्य होणार नाही. अर्थाभावामुळे शोधार्थीचा उत्साह, उमेद मावळत जाते. संशोधन करणारे मध्येच संशोधनकार्य अनेक कारणांमुळे सोडून जातात. त्यात तुलनात्मक संशोधन करणारे अधिक असण्याची संभावना आहे.

काही शोधार्थी तुलनात्मक संशोधनाकडे पद, प्रतिष्ठा, प्रसिद्धी या प्रलोभनांनी प्रवृत्त होतात. हे संशोधनकार्य त्यांना नीरस, कंटाळवाणे, व्यर्थ वाटत असते. अभिरुची नसल्याने ते हे कार्य अपुरेच सोडून देतात. वास्तविक काव्य, संगीताप्रमाणे अभिरुची असेल तर हे क्षेत्र अमित आनंदाचे व संतोषाचे आहे. आवडीचा विषय निवडणे आवश्यक आहे. अपूर्ण संशोधन करण्यापेक्षा ते न करणे चांगले.

ग्रंथालयीन सुविधा नसणे हा तुलनात्मक संशोधनातील मोठा अडसर आहे. अद्ययावत विषयासाठी विविध भाषांतील पत्रिका, नियतकालिके, संशोधनपर पत्रिका, सूचीग्रथ, संदर्भग्रंथ, साहित्यकृती, दुर्लभ ग्रंथ, इत्यादींची आवश्यकता असते. सुसज्ज ग्रंथालयाअभावी शोधार्थीस फार त्रास पडतो. महानगर अथवा नगर यांपासून दूर ग्रामीण क्षेत्रात, अथवा सुदूर पहाडी क्षेत्रात राहणाऱ्या शोधार्थीला तर ग्रंथ उपलब्ध न होणे ही नेहमीचीच अडचण आहे. तुलनात्मक संशोधनकार्य करणाऱ्या शोधार्थीस एक वेळ मातृभाषेतील संशोधनसामग्री उपलब्ध होऊ शकेल, पण मातृभाषेतर संशोधनसामग्री त्याच्या निवासी प्रदेशात उपलब्ध होत नाही. एकेक दुर्लभ ग्रंथ प्राप्त करण्यासाठी, तसेच संदर्भग्रंथ मिळविण्यासाठी त्यास महाप्रयास करावे लागतात. त्याचा मार्गदर्शक बहुभाषाविद् असेल तर त्याचे काम सुकर होते. पण एका भाषेतील जर तो विद्वान असेल तर शोधार्थीच्या अडचणी अधिक वाढतात. कधीकधी योग्य क्षमतापात्र मार्गदर्शकाअभावी प्रज्ञाशाली शोधार्थीचे तुलनात्मक कार्य कठीण बनते.

Scanned with OKEN Scanner

काही संदर्भग्रंथ अप्रकाशित अवस्थेत असतात. ते दूरवरच्या ग्रंथालयातून उसनवारीने आणावे लागतात. संशोधन-सामग्री जमविणे यात अभ्यासकाला अपार कष्ट करावे लागतात. कधी कधी योग्य विषयानुकूल सामग्री सहज उपलब्ध होत नाही. म्हणून काहीजण संशोधनकार्य अपुरे सोडून देतात.

भाषाशास्त्र या विषयासाठी प्रयोगशाळा व काही आवश्यक उपकरणांची आवश्यकता असते. अनेक विद्यापीठांतूनही अजून भाषाशास्त्राची प्रयोगशाळा नसते. त्यामुळे तुलनात्मक संशोधनाच्या दृष्टीने हे क्षेत्र खूपच उपेक्षित राहते.

तुलनात्मक संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना ग्रंथ उच्च कोटीचा असला तरी, त्याच्या प्रकाशनास अनंत अडचणी येतात. शोधप्रबंध थोड्याशा वाचकांच्या कामाची वस्तू बनणे हे ज्ञानविस्तारास घातक आहे. तुलनात्मक संशोधन करणाऱ्या अभ्यासकाचे प्रकृतिस्वास्थ्य चांगले असणे आवश्यक आहे. अनेक ग्रंथांचे वाचन, त्यांचे टिपण, लेखन, पुनर्लेखन यांत शारीरिक क्षमतेचा भाग अधिक आहे. शारीरिक स्वास्थ्य ठीक नसल्यामुळे विद्वान असूनही तुलनात्मक संशोधन क्षेत्र सोडणारे अभ्यासक पण दिसून येतात.

तुलनात्मक संशोधनास प्रवृत्त होणे

तुलनात्मक संशोधनक्षेत्रात त्या मानाने फारच कमी काम झाले आहे. या कार्याकडे विशेषतः अहिंदी प्रदेशातील अभ्यासक अधिक प्रवृत्त होत आहेत. मातृभाषेतर अन्य भाषा, हिंदी अथवा इंग्रजी या भाषेचे उत्तम ज्ञान प्राप्त करून तुलनात्मक संशोधन कार्य करणारे अनेक अभ्यासक आहेत. या क्षेत्राकडे वळताना आपल्या भाषेतील उत्कृष्ट कृती, चिंतन, विचार यांचा हिंदी अथवा इंग्रजी अथवा अन्य प्रांतीय भाषेत साम्य-वैषम्य या आधारावर मागोवा घेण्याचा प्रयत्न असतो. साहित्यप्रणाली, साहित्यप्रवृत्ती यांचे साम्य शोधण्याचा पण प्रयत्न असतो. यातूनच स्वभाषेतील उत्तम योगदानाची तुलना करीत अन्य भाषेत पोहोचवण्याची अथवा प्रदर्शित करण्याची मनीषा पण प्रबळ असत.

दुसरे व्यावहारिक कारण म्हणजे आज अक्षरशः हजारो प्रबंध लिहिले गेले आहेत. हिंदीत तर ४५०१ (इ. स. १९७९) स्वीकृत प्रबंध आहेत.[६] अशा वेळेस एकाच भाषेत नवीन विषय घेणे अशक्य होते. त्यामुळे दिल्लीसारख्या हिंदी प्रदेशातील महानगरात पण हिंदभाषिक शोधार्थी तुलनात्मक संशोधनाकडे प्रवृत्त होऊन कबीर-

---

६. भारतीय हिंदी परिषद—हिंदी अनुशीलन विशेषांक, भाग १ व २, १९७६ पर्यंत ३१६१ स्वीकृत प्रबंध.

Scanned with OKEN Scanner

तुकारामांवर प्रबंधलेखन करू लागले आहेत. तुलनात्मक संशोधनाचे क्षेत्र अनेकांना सद्यःस्थितीत सहज सामावून घेऊ शकेल.

माध्यम

तुलनात्मक संशोधनाचे निष्कर्ष प्रस्तुत करताना कोणत्या भाषेचा आश्रय घ्यावा? हा प्रश्न आहे. वास्तविक भौगोलिक दृष्टीने जवळ असणाऱ्या दोन प्रादेशिक भाषांत तुलनात्मक संशोधनास अधिक उपयुक्त संधी आहे. दोन भाषांच्या सीमावर्ती प्रदेशात तर तुलनात्मक संशोधन करणे अभ्यासकास सहज शक्य होते. पण या दोन प्रादेशिक भाषांत होणाऱ्या तुलनात्मक संशोधनाचे माध्यम एक प्रादेशिक भाषा राहणार यात संशय नाही. त्या प्रादेशिक भाषा जाणणाऱ्या हिंदी विद्वानांनी ते हिंदीत आणावे ही कल्पना पण रास्तच आहे. पण या संबंधात अजून एक सवलत मिळावयास हवी. दोन प्रांतीय भाषांच्या साहित्यकृतींवर तुलनात्मक संशोधन करणारा शोधार्थी जर ते हिंदी माध्यमाद्वारे प्रस्तुत करू इच्छित असेल तर तशी मान्यता, त्याची योग्यता, क्षमता, भाषाप्रभुत्व पाहून, देण्यास हवी. हिंदी आणि भारतीय भाषासाहित्य तुलनेचे संबंधित संशोधनप्रबंधाचे माध्यम हिंदी राहणे इष्ट ठरेल. त्यामुळे बहुसंख्याक हिंदी भाषिकांना तुलनात्मक अध्ययनाने प्रदर्शित केलेली समानता समजेल. आज काही इंग्रजी प्रबंध वगळता तुलनात्मक क्षेत्राचे बहुतांशी कार्य हिंदीत होत आहे. दोन भाषांतील तुलनात्मक संशोधनाचे कार्य मराठीत जवळजवळ नगण्य आहे.

महत्त्व

संशोधनकार्य हे मूलतः कोणत्याही देशाचे, समाजाचे गौरवस्थान असते. तुलनात्मक संशोधनकार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीने अत्यंत उपकारक आहे. भाषासाहित्यातील संशोधनाने भाषेच्या अभेद्य भिंती कोसळतात. एखाद्या भाषेविषयी असणारे अपसमज, पूर्वग्रह दूर होतात. एखाद्या भाषेस आपण समृद्ध, उन्नत, संपन्न मानत नाही, पण तुलनात्मक संशोधनाने त्या भाषेचे अपार सौंदर्य व वैभव आपणांस ज्ञात होते. रवींद्रनाथांनी म्हटले आहे की, 'मनुष्याने कितीही प्रयास केले तरी मधुकोशाच्या छोट्याशा जागेत तो आपला मध निर्माण करू शकत नाही, त्याला त्याच्या भिंती-बाहेरूनच अखंड जीवनरस प्राप्त होत असतो." [उद्धृत, वसंत बापट, "तौलनिक साहित्याभ्यास", पृ. १)

तुलनात्मक साहित्य-संशोधन हे राष्ट्रीय संस्कृती, एकात्मता, सौहार्द व सहकार्य यांस अत्यंत पोषक आहे. आपल्या शेजारच्या प्रांतांतील लोकांविषयी आपले भ्रम दूर होऊन मने स्वच्छ होतील. विविध प्रांतांतील, तसेच अन्य प्रदेशांतील साहित्य-समृद्धीचे ज्ञान होऊन आपले स्वभाषेतील साहित्याचे राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय

साहित्याच्या प्रकाशात परीक्षण करता येईल. राष्ट्रीय–साहित्य परंपरेचे ज्ञान होऊन राष्ट्रीयतेचे पण भान येईल. भारतीय विविधतेतून अखंड प्रवाहीत होणारी एकता पण प्रत्ययास येईल. आपल्या जाणिवेत संख्यात्मक भर न पडता तिला गुणात्मक बळ लाभेल. इंग्रजी व मराठी एकवंशीय भाषा आहेत, याउलट मराठी, कानडी भिन्न-वंशीय भाषा आहेत हे तुलनात्मक संशोधनाने कळते. भाषेमध्ये कालिक भेद असतात व एका भाषेत एकरूपता नसते हे पण समजते. तुलनात्मक संशोधनाने दृष्टिकोण विशाल होतो, तसेच साहित्यकलेची सूक्ष्मतम जाण येते. ज्ञानाची अनंत वृद्धी होते. भारतीय भावात्मक एकतेसाठी तुलनात्मक अध्ययन उपयुक्त आहे.[७]

उद्देश

मनुष्याच्या ज्ञानासंबंधी समस्त शोधकार्याचे परम ध्येय अत्यंत अज्ञात सत्याचा शोध घेणे हा आहे. ज्ञानासंबंधी लघुतम शोध पण परमध्येयाकडे संकेत करीत असतो आणि त्याच्या निकट पोहोचण्यास सहायक होत असतो. संशोधनाचा मूळ उद्देश अनंत व श्रृंखलाबद्ध ज्ञानास प्रकाशित करणे हा आहे. हेच तुलनात्मक संशोधनाचे पण उद्दिष्ट आहे.

आपल्या या प्रिय भारतवर्षास स्वच्छ सुंदर प्रकाशाचे, नियमित मोसमी बरसणाऱ्या पावसाचे वरदान आहे, तसेच बहुविध भाषांचे पण आहे. भारतातील विविध भाषा आमचा अनमोल ठेवा आहे. तुलनात्मक संशोधनाने या भाषाकोषागारातील रत्नांचा प्रकाश अगणितांपर्यंत पोहोचणार आहे. तुलनात्मक संशोधनक्षेत्राची किंचित् मळलेली वाट प्यासी होऊन अनेक प्रज्ञाशाली, त्यागी, समर्पित जीवनांची प्रतीक्षा करीत आहे.

प्रतिसाद किती मिळणार हा यक्षप्रश्न आहे.

संदर्भ

१. **तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्त्वे आणि दिशा** वसंत बापट, मौज प्रकाशन गृह, मुंबई; सप्टेंबर १९८१; पृ. ११०; १२ रु.

२. **तौलनिक वाङ्मय** – पंडित आवळीकर, "भाषा व साहित्य : संशोधन", संपा. वसंत स. जोशी, १९८१, पृ. ३९६–४०३.

---

७. "The study of a single literature would remain the apere and comparative literature would serve as a source of enrichment of specialization."
Comparative Literature, Vol. I, Eassay, by Anna Balkian) P.236